**अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र. सीटीसी २००७/(३६२/०७)/तांशि-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १७ सप्टेंबर, २००७.

संदर्भ : अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र
(१) एफ क्र. ०६/०७/एमएस/इंजि./२००७/७, दिनांक २४.७.२००७.
(२) एफ क्र. ०६/०७/एमएस/इंजि./२००७/०९, दिनांक ३१.७.२००७.
(३) एफ क्र. ०६/०७/एमएस/इंजि./२००७/१२, दिनांक ३१.७.२००७.
(४) एफ क्र. ०६/०७/एमएस/इंजि./२००७/१४, दिनांक १६.८.२००७.

**प्रस्तावना** : अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधिन पत्रांन्वये राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २००७-०८ करिता मान्यता दिली आहे. तथापि, सदर मान्यता दिनांक ३० जून, २००७ नंतर दिलेली असल्याने या संस्थांचा शैक्षणिक वर्ष २००७-०८ मधील प्रवेशप्रक्रियेत समावेश करण्यात आला नव्हता. या संस्थांनी चालू शैक्षणिक वर्षात प्रवेशास मान्यता मिळण्याकरिता उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे याचिका क्र. ३४२३, ३४२४, ३४२५/२००७ व ३७९१/२००७ दाखल केल्या होत्या. सदर याचिकांच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे एसएलपी क्र. १६१४४/२००७ दाखल केली होती. सदर एसएलपीच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६.९.२००७ रोजी दिलेल्या आदेशानुसार या संस्थांना शैक्षणिक वर्ष २००७-०८ करिता प्रवेश करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रांन्वये खालील संस्थांना शैक्षणिक वर्ष २००७-०८ करिता अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता दिली आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १ | गुरुनानक एज्युकेशन सोसायटीचे गुरुनानक इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, खासर नं. ९४, ९५ व १६४/१, मौजा दहेगांव, ता. कळमेश्वर, जि.नागपूर-४४०००१ | कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरींग | ६० |
| | | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी | ६० |
| | | इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग | ६० |
| | | इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्यु. इंजिनिअरींग | ६० |
| | एकूण | | २४० |
| २ | सत्यिकित्सक प्रसारक मंडळाचे डॉ. भाऊसाहेब नांदूरकर कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, श्री. सत्य साई क्रिडा नगरी, वाघापूर, यवतमाळ-४४५००१ | बायो मेडिकल इंजिनिअरींग | ६० |
| | | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ६० |
| | | इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० |
| | | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी | ६० |
| | एकूण | | २४० |

(कृपया मागे पहा.)

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | विदर्भ बहुउद्देशिय शिक्षण संस्थेचे तुळशीरामजी गायकवाड-पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅण्ड टेक्नॉलॉजी, मोहगांव, वर्धा रोड, नागपूर-४४११०८. | कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनिअरींग | ६० |
| | | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी | ६० |
| | | इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड कम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० |
| | | इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग | ६० |
| | | एकूण | २४० |
| ४ | लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्थेचे श्रीमती भगवती चतुर्वेदी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, हारपूर नगर, उमरेड रोड, नागपूर-४४० ००९. | इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड कम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० |
| | | कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनिअरींग | ६० |
| | | इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग | ६० |
| | | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी | ६० |
| | | एकूण | २४० |

या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थांना खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच, दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

(२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

(३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतुदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

(४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण यांच्याकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

(५) सदर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/ पध्दतीनुसार करण्यात येतील.

(६) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

(७) प्रवेश प्रक्रियेकरिता सदर संस्थेने रु. १ लाख जाहिरात खर्च संचालनालयास अदा करावा. तसेच, मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार अटी लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(भ. स. घानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर/अमरावती.
कुलसचिव, संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
कुलसचिव, राष्ट्रसंत गाडगे महाराज अमरावती विद्यापीठ, अमरावती.
प्राचार्य, संबंधित संस्था.

प्रत माहितीसाठी :-

अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११०००२.

सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्य बळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डिंग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई.

निवडनस्ती/तांशि-१